# सुगम अध्यात्म

## अनुक्रमणिका

(काही वैशिष्ट्यपूर्ण सूत्रे [मुद्दे] '*' या चिन्हाने दर्शवली आहेत.)


सनातनच्या चैतन्यमय ग्रंथसंपदेची वैशिष्ट्ये ! ८

* संकलकांचा वैज्ञानिक दृष्टीकोन आणि अन्य माहिती ९

* मनोगत ११

* 'सुगम अध्यात्मशास्त्र' या ग्रंथमालिकेतील ३ खंडांत पू. बाळाजी (पू. दादा) आठवले यांच्याविषयी दिलेल्या माहितीची अनुक्रमणिका १२

* पू. बाळाजी (पू. दादा) आठवले यांचा संक्षिप्त परिचय १३

* पू. दादांच्या लिखाणाची सनातनच्या साधकांना जाणवलेली वैशिष्ट्ये १३

* पू. दादांच्या छायाचित्राची सनातनच्या साधकांना जाणवलेली वैशिष्ट्ये १६

* पू. बाळाजी वासुदेव आठवले यांची सूक्ष्मातील वैशिष्ट्ये २०

* पू. दादांच्या हस्तलिखितातील चैतन्य २२

* प्रकरण

१. बुद्धीपप्रामाण्यवादी ३०

२. अहंकार ३१

३. अध्यात्म ३४

४. मृत्यू आणि मृत्यूनंतर ३८

५. कर्मयोग ४१

६. ज्ञानयोग ४४

७. निरनिराळ्या योगमार्गांची तुलना ६२

८. साधक ६३

९. शिष्य ७४

१०. संत ७७

११. गुरु ८३

१२. राष्ट्र ८७

# मनोगत

‘तरी विद्यांमाजीं प्रस्तुतीं । अध्यात्मविद्या ते मी ।’, म्हणजे ‘सर्व विद्यांमध्ये (श्रेष्ठ) मी अध्यात्मविद्या आहे’, असे ज्ञानेश्वरांनी ‘ज्ञानेश्वरी’त भगवंताचे वर्णन करतांना सांगितले आहे. अध्यात्मविद्या जाणून घेणे म्हणजेच भगवंताला जाणून घेणे. प्रत्येकजण आपली प्रकृती आणि योगमार्ग यांनुसार भगवंताला जाणून घेण्याचा प्रयत्न करतो. सर्व शास्त्रांमध्ये अध्यात्म हे एकमेव शास्त्रच आपल्याला आत्म्याच्या खऱ्या स्वरूपाची, म्हणजे भगवंताची ओळख करून देते अन् सत्-चित्-आनंदमय बनवते.

ईश्वरप्राप्ती हे ध्येय साध्य करण्यासाठी मनुष्याने सातत्याने साधना करणे आवश्यक आहे. ज्ञानयोग, कर्मयोग इत्यादी योगमार्गांने साधना करतांनाही संत किंवा गुरु यांचे मार्गदर्शन आवश्यकच असते; अन्यथा अहंकाराचे वादळ त्याची साधनारूपी नौका परमार्थाच्या पैलतीरी पोहोचण्याआधीच नष्ट करते. संत किंवा गुरु प्रथम अहंकार नष्ट करतात; मगच आत्मज्ञान देतात. ते जीवनात येण्यासाठी स्वतःत साधकत्व निर्माण होणे महत्त्वाचे आहे. चांगले साधकत्व आणि शिष्यत्व निर्माण होण्यासाठी काय करायला हवे, याविषयीचे बहुमोल मार्गदर्शन अत्यंत सोप्या पद्धतीने या ग्रंथात केले आहे.

ज्ञानयोग, कर्मयोग इत्यादी साधनेचे विविध योगमार्ग, साधनेसंदर्भात मार्गदर्शक तत्त्वे, अहंकारामुळे साधनेत होणारी हानी अन् त्यांवरील उपाय यांची माहिती या ग्रंथात असून शिष्य कसा असावा ? संत कसे असतात ? संतांची खडतर साधना आणि गुरूंचे महत्त्व यांविषयीची माहिती यात दिली आहे. बुद्धीप्रामाण्यवाद्यांचा नास्तिकवाद, मनुष्याचा मृत्यूकडे योग्य पहाण्याचा दृष्टीकोन, तसेच राष्ट्रप्रेम अशा विविध विषयांवरील उपयुक्त आणि अनमोल माहितीही अत्यंत सोप्या भाषेत अन् उदाहरणांद्वारे या ग्रंथात दिली आहे.

ही अध्यात्मविद्या आत्मसात होऊन सर्वांची पारमार्थिक उन्नती होवो अन् अध्यात्माचे अधिष्ठान असलल्या आदर्श राष्ट्ररचनेच्या, हिंदु राष्ट्राच्या निर्मिती-कार्यात सहभागी होण्याची बुद्धी सर्वांना होवो, अशी ईश्वरचरणी प्रार्थना ! - **संकलक**